नियमित दिवाणी दावा क्र.३१/२०१७
शकुंतलाबाई वि. नागाबाई व इतर
नि.क्र.८३/ क (सोबत)

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ३

<u>**उलटतपास वादीतर्फे वकील श्री. यु.एस. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु.**</u>

०१. माझे वडील सन १९९० साली मयत झाले. माझे वडीलांना चार भाऊ होते. माझे वडील मयत होणेपुर्वी भावापासून विभक्त राहत होते. माझे वडीलांच्या हिश्यास १४ एकर जमीन आली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांनी त्यांच्या हयातीमध्ये १ गुंठा ही जमीन विक्री केलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ३ माझा भाऊ असुन वादी क्र. १, २ व प्रतिवादी क्र. ४ व ५ माझ्या बहिनी आहेत. माझी आई नागाबाई सन २०२२ मध्ये मयत झाली आहे. प्रतिवादी क्र. ७ विठ्ठल माझा मुलगा असुन प्रतिवादी क्र. ६ ही माझी पत्नी आहे. आमच्या भावा बहिनीमध्ये मिळकतीच्या वाटण्या झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही माझे वडीलांच्या हिश्यास आलेल्या जमीनीपैकी आहे. माझे बहिनींची लग्न माझे वडीलांच्या हयातीमध्ये झाले. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलानंतर कुटूंब प्रमुख म्हणुन मी कारभार पाहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ८ हा प्रतिवादी क्र. ४ चा पती आहे. ज्यावेळी मी प्रतिवादी क्र. ८ गोविंद भिंगोलेला २ हे. ३ गुंठे जमीन विक्री केली होती त्यावेळी माझे बहिनींच्या सहया मी खरेदीखतावर घेतलेल्या नव्हत्या. गट क्र. २२ मधील २२ आर क्षेत्राचा कोणताही व्यवहार झालेला नाही. प्रतिवादी क्र. ८ यांना जमीन खरेदी देण्यापूर्वी मी जाहीर प्रगटन केलेले नव्हते. माझे वडील मयत झाल्यानंतर माझे बहिनींची नावे ७/१२ उता-यावर लावलेली नव्हती. ७/१२ उता-यावर माझा भाऊ प्रतिवादी क्र.३ यांचे ही नाव लागलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९९ मधील खरेदीखतामध्ये कुटूंब कर्ता म्हणुन माझे नाव लागलेले आहे. खरेदी खत झाल्यानंतरही माझे बहिनींची संमती घेतलेली नव्हती. साक्षीदार पुन्हा सांगतो की, दावा दाखल केल्यानंतर शांताबाई हीची संमती घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २००८ साली लातूर येथे तुकाराम कोडगिरे यांच्याकडुन रक्कम रु.३,५०,०००/- ला प्लॉट घेतला आहे. सदर खरेदीखतावर साक्षीदार म्हणुन माझी सही नाही. सदर खरेदीखताचा व्यवहार कसा झाला होता या बाबत मला माहिती नाही. सदर खरेदीखताची रक्कम दुय्यम निबंधक यांच्या समक्ष दिली आहे किंवा नाही या बाबत मला माहिती नाही. सदर जमीनीची किम्मत प्रति एकरी

ठरलेली नव्हती. भिंगाले यांनी खरेदीखताची संपूर्ण रक्कम दुय्यम निबंधकासमक्ष दिलेली नव्हती. सदर खरेदीखतावरील संपुर्ण रक्कम भिंगोले यांनी दिली होती या संदर्भातील लेखी पुरावा माझेकडे नाही. सन १९९९ साली माझे बॅकेत खाते नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, शेती व्यतिरिक्त माझा इतर कोणताही व्यवसाय नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी नोकरी अथवा व्यवसाय करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे व माझे पत्नीचे शेती व्यतिरिक्त इतर कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतातील २ हे. ३ आर जमीन प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी पुन्हा वेगवेगळी खरेदी केली आहे. सन २०११ साली माझे पत्नीकडे रक्कम रु. २,१५,०००/- लाख रुपये होते हे दर्शविणारा लेखी पुरावा माझे कडे नाही. साक्षीदार सांगतो की, माझे पत्नीच्या भावाने सदरची रक्कम दिली होती. माझे पत्नीला तिच्या भावंडामध्ये झालेल्या वाटणीमधील रोख स्वरुपात रक्कम दिली गेली होती असे दर्शवविणारा लेखी पुरावा माझेकडे नाही. विठ्ठल यांच्याकडे शेती व्यतिरिक्त इतर कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. प्रतिवादी क्र. ३ भीम हा सन १९९२ पासून लातूर येथे सुयश क्लासेस चालवतो व तसेच त्याची पत्नीही दोन ठिकाणी क्लासेस चालवते.

०२. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. १ ची मुलगी ही प्रतिवादी क्र. ३ ची पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील मयत झाल्यापासून प्रतिवादी क्र.३ भीम हा लातूर येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, शंकुतलाबाई व शांताबाई यांना जमीनीमधील हिस्सा मिळु नये म्हणुन सन १९९९ साली मी भिंगोले यास जमीन विक्री केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९९ साली भिंगोले बरोबर आमचा कोणताही पैश्याचा व्यवहार झालेला नव्हता व पुन्हा भिंगोलेकडुन जमीन खरेदी घेतानासुध्दा कोणताही पैश्याचा व्यवहार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ८ हा औराद शहाजानी येथील मोठा शेतकरी असुन त्यांचेकडे १०० एककहुन अधिक जमीन होती व ते सावकारी व्यवसाय करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, शंकुतलाबाई व शांताबाई हीचे माझे बरोबर जमत नव्हते. मी साक्षीला येणेपुर्वी प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी काय जबाबदावा दिला याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, शंकुतलाबाई, शांताबाई, नागाबाई, भीम, सुनंदा व सिमा यांचे जमीनीमधील हक्क डावलण्यासाठी मी भिंगोले यांच्या बरोबर संगनमत करुन सन १९९९ साली खरेदीखत झाल्याचे दर्शविलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, एकत्रीत कुटूंबाची कोणतीही कायदेशीर गरज नसतांना मी भिंगोले बरोबर सदरचा व्यवहार केल्याचे दाखविले आहे. माझे वडील मयत झाल्यानंतर

आमच्या कुटूंबाचा आर्थिक व्यवहाराचा मी कोणताही लेखा-जोखा ठेवलेला नाही. माझे वडील मयत झाल्यापासुन माझे संपुर्ण कुटूंबाचा खर्च मी स्वतः करत होतो. आईचा दवाखान्याचा खर्च मी व माझा भाऊ करत होतो. सन १९९९ पासुन २०११ पर्यंत माझे सर्व कुटूंबाचा खर्च माझे शेतीतून आणि माझे चुलत भावाची बटाईने करत असलेल्या शेतीच्या उत्पानातून करत होतो. मी माझे चुलत भावाची शेती बटाईने करत असल्याबाबत माझेकडे लेखी पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९९ पासून २०११ पर्यंत दावा मिळकतीमध्ये गोविंद भिंगोले कधीही आला नव्हता व सदर मिळकत मी तेव्हा पासुन मी कसत होतो.  हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत मी कुटूंब कर्ता म्हणुन कसत होतो तसेच सन २०११ पासुन आज पर्यंत सदरची मिळकत मी कुटूंब कर्ता म्हणुनच कसत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, शंकुतलाबाई व शांताबाई यांना दावा मिळकतीतील हिस्सा मिळु नये म्हणुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २० डिसेंबर २०१६ मध्ये शकुंतलाबाई व शांताबाई यांनी दावा मिळकतीमध्ये हिस्सा मागितला होता. दावा दाखल झाल्यानंतर त्यांनी त्यांचा हिस्सा मागितला आहे हे मला माहित आहे. निवृत्ती रेड्डी यांच्या मिळकतीमध्ये शकुंतलाबाई व शांताबाई यांना कोणताही हिस्सा दिलेला नाही.

<u>**उलटतपास पूर्ण .**</u>

<u>**फेरतपास नाही.**</u>

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2025.04.28 11:31:49 +0530

दि.२४/०४/२०२५

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.